# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

## महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

WWW.DVET.GOV.IN e-mail: dk12_dvet@YAHOO.COM Fax- 22659235/22675628 Phone No. 22620604/293.


क्र.१२/एएफएन/२००८/(१३)/ ३३१.
दिनांक :- २० मे,२००८.

प्रति,

प्राचार्य / अध्यक्ष,
श्री. सद्गुरु बाळूमामा शि.प्र.मंडळ, मुदाळ संचलित
श्री.परशराम बाळाजी पाटील औ.प्र.केंद्र,मुदाळ,
ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

**विषय :- नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यांस परवानगी देणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, नवीन खाजगी कायम विना अनुदानीत औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यांकरिता केलेल्या अर्जास अनुसरुन शासन निर्णय क्र.आयटीआय-२००८/(२६४/०८)/व्यशि-२, दि. १७ मे,२००८ अन्वये श्री. सद्गुरु बाळूभामा शि.प्र.मंडळ, मुदाळ संचलित श्री.परशराम बाळाजी पाटील औ.प्र.केंद्र,मुदाळ, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर या ठिकाणी सन २००८-०९ या सत्रापासून कायम विना अनुदान तत्त्वावर औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी शासनाने खालील अटींच्या अधिन राहून तत्त्वतः परवानगी दिलेली आहे.

१) नवीन संस्थांसाठी मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने आवश्यक त्या बाबींचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग म्यॅन्युअल मधील मानकानुसार १००% पूर्तता करुन दि.२० जून,२००८ ते ३० जून,२००८ या कालावधीत आपल्या संस्थेचे स्थायी समितीतर्फे निरीक्षण करण्यांत येईल. तत्पूर्वी १५ जून,२००८ पर्यंत पूर्व निरीक्षण अहवाल संबंधीत प्रादेशिक कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.तद्नंतर स्थायी समितीचे निरीक्षण लावण्यांत येईल.

२) संस्थेने स्थायी समितीचे निरीक्षण करुन निरीक्षण अहवाल डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचेकडे संलग्नेसाठी पाठवून संलग्नता प्राप्त झाल्यावर प्रत्यक्ष प्रवेशास संचालनालयाकडून स्वतंत्र परवानगी देण्यांत येईल. तद्पूर्वी प्रवेश देण्यांत येऊ नयेत.

३) संस्थेने प्रत्यक्ष प्रवेश देण्यापूर्वी शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-१, दि.१५एप्रिल,२००२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार रुपये १,००,०००/- (रुपये एक लांख फक्त) एवढी अनामत रक्कम संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई-४०० ००१ यांचे नांवे धनादेश काढून संचालनालयास जमा केल्यानंतरच तसेच संलग्नता प्राप्त झाल्यानंतर प्रवेशाची परवानगी संचालनालयाच्या स्तरावर देण्यांबाबत कार्यवाही केली जाईल.

४) या व्यतिरिक्त नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करणेसंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे काटेकारपणे पालन करणे आवश्यक आहे.

५) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे संस्थेने पालन न केल्यास किंवा प्रवेश,निरीक्षण,संलग्नता,प्रशिक्षण व परिक्षा इ.बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता आढळल्यास संस्थेस दिलेली परवागनी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

६) त्याचप्रमाणे डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई-१ यांनी वेळोवेळी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेला लागू राहतील.

...२/-

आ.नं. १ ला नोंद
०४/०६/०८